आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शुक्रवार दिनांक १२ डिसेंबर २०२५

ठळक बातम्या

- महाराष्ट्र नक्षलवादमुक्त होण्याच्या उंबरठ्यावर असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन.
- वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वे प्रकल्पातील गौण खनिज ईटीएस मोजणी अहवाल दोन महिन्यात सादर करण्याचे विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचे निर्देश.
- कुपोषणामुळं होणारे बालमृत्यू टाळण्यासाठी प्रयत्नशील असल्याची राज्य सरकारची ग्वाही.
- काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचं निधन; राष्ट्रपती, पंतप्रधानांसह मान्यवरांची आदरांजली.

नक्षलवाद- फडणवीस

देशातून २०२६ पर्यंत नक्षलवाद संपुष्टात आणण्याच्या केंद्र सरकारच्या उद्दिष्टाच्या दिशेने महाराष्ट्र निर्णायक पाऊल टाकत असून राज्य नक्षलवादमुक्त होण्याच्या उंबरठ्यावर असल्याच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितल. विधानभवनात आयोजित राष्ट्रीय योजना व कृती आराखड्याबाबत राज्यस्तर गठीत समितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. अति दुर्गम भागांत नवीन पोलिस चौक्या उभारून त्याठिकाणी कल्याणकारी कार्यक्रम आयोजित करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. नक्षलवाद्यांच्या आत्मसमर्पणामागे पोलिसांचे प्रयत्न महत्त्वाचे आहेत असं सांगून  गडचिरोली पोलिसांना 1 कोटी रुपयांचे बक्षीस देण्याची कार्यवाही पूर्ण करावी तसेच नक्षलवादाविरोधात उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना पदोन्नती द्यावी. गडचिरोलीतील नवीन पोलीस अधीक्षक कार्यालयाचे काम तातडीने सुरू करून पोलीस दलासाठी ३३  नवीन वाहनांची खरेदी पूर्ण करण्याचेही निर्देश त्यांनी दिले.

वर्धा-यवतमाळ-नांदेड-रेल्वे प्रकल्प

वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वे प्रकल्पातील गौण खनिज ईटीएस मोजणी अहवाल दोन महिन्यात सादर करण्याचे निर्देश विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी आज दिले. या प्रकल्पात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असून सरकारचा ६०० कोटींचा महसूल बुडाल्याची तक्रार अमोल कोमावर यांनी केली होती. या प्रकरणी विधानसभा उपाध्यक्षांच्या दालनात आज बैठक झाली, यावेळी तहसीलदार, मंडळ अधिकारी, भूमी अभिलेख, रेल विकास निगम यांनी एकत्रित समिती तयार करून ईटीएस मोजणी अहवाल सादर करावा असे निर्देश उपाध्यक्षांनी दिले.

विधानसभा

राज्यात जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षकांच्या **15,158** इतक्या जागा रिक्त असून त्यासाठीची पदभरती प्रक्रिया लवकरच राबवली जाईल अशी माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी या संदर्भातील मोहन मते यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या उत्तरात दिली. आतापर्यंत **66** हजार शिक्षकांच्या बदलीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे, मात्र बदली धोरण नव्यानं आणण्याचा विचार सुरू आहे. मे महिन्यापर्यंत ही बदली प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल अशी ग्वाही देखील गोरे यांनी यावेळी दिली. ऐकुया आज विधानसभेतील कामकाजाचा वृत्तांत आमच्या प्रतिनिधींकडून

*बृहन्मुंबई महानगर क्षेत्रातील तब्बल **20** हजार इमारतींना भोगवटा देऊन दिलासा देणारा निर्णय शासनाने घेतला असून त्याची अंमलबजावणी आजपासून सुरू झाली आहे, अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी दिली. या निर्णयाचा थेट लाभ **4** ते **5** लाख सदनिकांना होणार आहे. राज्यात सुरू असलेलं उमेद अभियान कधीही बंद होणार नाही , यासंदर्भात ही अफवा पसरवली जात आहे, त्याबाबत निश्चितपणे चौकशी केली जाईल अशी ग्वाही ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी या संदर्भातील लक्षवेधी सूचनेवर दिली. ही लक्षवेधी सूचना संतोष बांगर यांनी उपस्थित केली होती, त्यावर सुधीर मुनगंटीवार, नमिता मुंदडा आदींनी उपप्रश्न विचारले. या अभियाना अंतर्गत सहा लाख **53** हजार बचत गटांची स्थापना करण्यात आली असून पाच लाख **35** हजार समूहांना निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. राज्यात सर्व जिल्ह्यांमध्ये महिलांसाठी हक्काची बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी उमेद मॉल उभारण्यात येतील, त्यासाठी **200** कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्यात आला असून येत्या वर्षभरात त्यातील **10** मॉल उभारण्यात येतील अशी माहिती गोरे*

*यांनी दिली. राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत दहा वर्ष सेवा पूर्ण केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समायोजन कायमस्वरूपी कर्मचारी म्हणून करण्यासंदर्भात येत्या मार्चपर्यंत सकारात्मक निर्णय अपेक्षित आहे. यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्यात येत असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य खात्याचे मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासा दरम्यान दिली. सुधीर मुनगंटीवार यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता. प्रत्येक खरेदी केंद्रावर हेक्टरी* ***23*** *क्विंटल प्रमाणे कापूस खरेदी होणार असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत निवेदन करताना दिली. शेतकरी सुधारित सिंचन पद्धती आणि आधुनिक शेती तंत्रांचा वापर करून अधिक उत्पादन घेत आहेत. मात्र, प्रत्यक्षातील जादा उत्पादन खरेदी केंद्रावर विक्रीसाठी आणल्यावर, उत्पादकता मर्यादा कमी असल्याने अनेक शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे ही मर्यादा वाढविण्याची मागणी लोकप्रतिनिधी आणि शेतकरी सातत्याने करत होते.*

विधानपरिषद

राज्यातल्या तीव्र कुपोषित बालकांची संख्या २०१९-२० मध्ये २४६ होती. ती २०२५-२६ मध्ये ९७ पर्यंत कमी झाल्याची माहिती महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी विधान परिषदेत चर्चेच्या उत्तरात दिली. एकाही बालकाचा कुपोषणामुळे मृत्यू होऊ नये यासाठी शासन प्रयत्नशील आहे. त्यासाठी महिला आणि बालविकास, आरोग्य, आदिवासी विकास या संबंधित विभागांचा गट तयार करण्यात येईल, असंही तटकरे म्हणाल्या. उमा खापरे यांनी कुपोषणामुळे बालकांच्या होणाऱ्या मृत्यूसंदर्भात चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेत सदस्य सर्वश्री संजय खोपडे, प्रवीण दरेकर, चित्रा वाघ यांनी सहभाग घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास देशभरातील विद्यार्थ्यांपर्यंत योग्य गौरवाने पोहोचावा, याबाबत राज्य सरकार कटिबद्ध आहे. यासाठी पाठपुरावा अधिक वेगाने केला जाणार असल्याचं राज्यमंत्री पंकज भोयर यांनी अर्धातास चर्चेला उत्तर देताना सांगितलं. सत्यजित तांबे यांनी सीबीएसई अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील इतिहासाचे लेखन अपुरे असल्याबद्दल चर्चा उपस्थित केली होती. दरम्यान मातोश्री रोजगार हमी पांदण रस्ते योजनेसह आता ‘मुख्यमंत्री बळीराजा पांदण रस्ते योजना’ नव्याने सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून मंत्रिमंडळाने त्यास मंजुरी दिली आहे.

मोर्चा

अनुसूचित जाती आरक्षणात उपवर्गीकरण करण्याच्या प्रमुख मागणीसाठी मातंग समाजाचा मोर्चा आज लहुजी शक्ती सेनेच्या नेतृत्वाखाली नागपुरात आयोजित करण्यात आला. राज्यभरातील हजारो समाज बांधव या मोर्च्यात सहभागी झाले. लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू कसबे यांनी याबाबत अधिक माहिती दिली -

*1 ऑगस्ट 2024 मध्ये देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या आरक्षणाचा उपवर्गीकरण्याचा व वर्गीकरन संदर्भामध्ये त्या निर्णयाच्या अंमलबजावणी संदर्भात महाराष्ट्र राज्यातील जे आरक्षणाच्या लाभापासून वंचित राहिलेला जो घटक असेल तो घटक आणि मातंग समाज या ठिकाणी सातत्याने या सरकारकडे त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची मागणी करतो आहे गेल्या वर्षभरामध्ये 15 महिन्यांमध्ये देशातल्या पाच राज्यांनी न्यायालयाच्या निर्णयाच्या अंमलबजावणी केली. मात्र ज्या महाराष्ट्र राज्याला आपण पुरोगामी राज्य म्हणतो त्या ठिकाणी मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करायला 15 महिन्याचा कालावधी लागतो ही शोकांतिका आहे.*

दिनांक **1** नोव्हेंबर **2005** नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या नेतृत्वाखाली आज नागपूर विधानभवनासमोर भव्य मोर्चा काढण्यात आला. **DCPS, NPS, RNPS, UPS** या योजना पूर्णपणे असुरक्षित असल्याचा आरोप करत, शासनाने जुनी पेन्शन योजना तत्काळ लागू करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. राज्याच्या कानाकोपऱ्यातून मोठया प्रमाणात कर्मचारी यात सहभागी झाले होते.

उद्धव ठाकरे/ हर्षवर्धन सपकाळ

वेगळ्या विदर्भाच्या मागणीला आमचा पाठिंबा नाही असं प्रतिपादन उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी केलं. आज विधिमंडळ परिसरात घेतलेल्या पत्रकार परिषदेत विरोधी पक्ष नेते पद, शेतकऱ्यांची कर्जमाफी, आगामी निवडणूक या संदर्भात त्यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. विदर्भ हा महाराष्ट्राचा मूलभूत भाग आहे आणि सध्याचे विदर्भाचे मुख्यमंत्री संपूर्ण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत, असं ठाकरे म्हणाले. हिवाळी अधिवेशन हे मुख्यत्वे विदर्भाचे प्रश्न सोडवण्यासाठी घेण्याचा प्रघात राहिलेला असल्याचं त्यांनी आवर्जून सांगितलं. तर नागपूरचे हिवाळी अधिवेशन अवघे

एक आठवड्याचे घेऊन भाजप महायुती सरकारने विदर्भ कराराचा अनादर केला आहे. शेतकरी, कामगार, बेरोजगार, कायदा सुव्यवस्था, भ्रष्टाचार महिला सुरक्षा यासारखे असंख्य प्रश्न असताना अधिवेशनात त्यावर चर्चा होत नाही, महायुती सरकारच्या काळात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. नागपूर विधान भवनात सपकाळ यांनी प्रसार माध्यमांशी विविध विषयांवर संवाद साधला.

स्व.शिवराज पाटील

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील- चाकूरकर यांचं आज पहाटे लातूर इथं निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते. पाटील यांनी लोकसभेच्या सभापतीपदासह केंद्र सरकारमध्ये अनेक महत्त्वाची पदे भूषवली होती. लातूर मतदारसंघातून ते सात वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी पाटील यांच्या निधनावर शोक व्यक्त केला. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही आपल्या समाज माध्यमावर शिवराज पाटील यांना आदरांजली वाहिली आहे. शिवराज पाटील हे महाराष्ट्राच्या राजकीय मूल्यांना जपणारे आणि त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर उंचावणारे एक प्रतिष्ठित आणि सुसंस्कृत नेते होते असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या संदेशात म्हटलं आहे. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने सार्वजनिक जीवनातील अनुभवी, अभ्यासू आणि सुसंस्कृत नेतृत्व हरपले असल्याच काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटल आहे. पाटील यांच्यावर उद्या सकाळी ११ वाजता लातूर शहराजवळील वरवंटी इथं अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

हवामान

विदर्भात आज गोंदिया जिल्ह्यात ८.४ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. त्या पाठोपाठ यवतमाळ इथं ८ पूर्णांक ५ तर वाशिम इथं ९.६ तसच नागपूर आणि भंडारा इथं १० अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. अमरावती इथं १०.५, अकोला इथं १०.७ अंश सेल्सियस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. एकूणच थंडीचा कडाका बघता आज यवतमाळ जिल्ह्यात थंडीच्या लाटेचा येलो अलर्ट देण्यात आला असून उद्या वर्धा, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात थंडीची लाट कायम राहण्याची शक्यता नागपूरच्या

प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. आगामी १६ तारखेपर्यंत हवामान कोरडे राहणार आहे.

*****